सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (खुद्द) साठी बाह्य यंत्रणेमार्फत शिपाई पुरविण्यासाठी दि. १.९.२०१९ ते दि. ३१.८.२०२० या कालावधीसाठी दरकरार करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : सववि-३५.१९/प्र.क्र.१७६/आस्था-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१९

<u>पहा :-</u> १. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि २०१०/८४/विसु-१, दिनांक २७.९.२०१०
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि २०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१,दि. २.०२.२०१३
३. उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखास-२०१४/प्र.क्र.८२ /भाग-III /उद्योग-४,दि. १.१२.२०१६
४. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्रं.संकिर्ण२०१९/प्र.क्र.१३ / कामगार-८ दि. २२.०२.२०१९

<u>शासन निर्णय :-</u>

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (खुद्द) करीता संदर्भ क्र. २ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रक दि. ०२.०२.२०१३ व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भ क्रं. ०३ येथील शासन निर्णयात नमूद तरतुदीनुसार बाह्यस्त्रोतामार्फत विभागास शिपायांच्या सेवा पुरविण्याकरीता कंत्राटदार निश्चित करण्याकरिता ई- निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदांमधून लघुत्तम दराची निविदा स्विकृत करण्याच्या धोरणानुसार “अल्फाकॉम **सर्व्हिसेस** इंडिया, B-१०५/B विंग ,कैलाश एस्पलांडे ,घाटकोपर (वेस्ट)मुंबई-४०० ०८६,” या संस्थेची निवड करण्यात आली आहे.

२. **“अल्फाकॉम सर्व्हिसेस इंडिया”** संस्थेने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (खुदद) मंत्रालय, मुंबई येथे दि.१.९.२०१९ ते दि. ३१.०८.२०२० या कालावधीसाठी खालील नमूद केलेल्या दराने आणि अटी व शर्तीनुसार या विभागास शिपाई पुरविणे बंधनकारक राहील.

<u>शिपाई पदाचे दर</u>

अ) शिपायांच्या वेतनाचा मासिक ठोक दर रु. ९,४९९/- (रु. नऊ हजार चारशे नव्यान्नव फक्त)

आ)अतिकालिक भत्ता खालील प्रमाणे राहील.

१. सायंकाळी ७.०० - ८.०० वाजेपर्यंत....... रु. २४/-

२. रात्री ८.००-९.०० वाजेपर्यंत..... रु. ३०/-

३. रात्री ९.०० वाजल्यानंतर.........रु. ४०/-

अटी व शर्ती

१ उमेदवार भारतीय नागरिक असावा तसेच त्याची अर्हता किमान चौथी पास अशी असावी . त्याला मराठी लिहिता, वाचता, बोलता येणे आवश्यक आहे.

२ उमेदवाराचे वय १८ ते ४० वर्षे या दरम्यान असावे.

३ उमेदवाराजवळ आधार कार्ड /निवडणूक ओळखपत्र/पॅनकार्ड यापैकी एखादे ओळखपत्र असावे.

४ संस्थेतर्फे पुरविण्यात येणारे उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे किंवा प्रवृत्तीचे नसावेत .याबाबतचे स्वयंघोषणापत्र उमेदवार तसेच संबंधित संस्थेने दाखल करणे आवश्यक राहील.

५ दुर्देवाने उमेदवारास गंभीर स्वरूपाची इजा झाल्यास वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व शासनाकडे राहणार नाही .त्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

६ संदर्भ क्रं. ०४ येथील उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. २२.०२.२०१९ च्या शासन परिपत्रकात नमूद तरतूदीनुसार शासनाने निर्धारित केलेल्या वेतनदराप्रमाणे वेतन तसेच वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्ते अदा करणे संस्थेस बंधनकारक राहील .उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेल्या कायदेशीर आर्थिक दायित्व वेतनात अंतर्भूत असून संबंधित प्राधिकरणाकडे कायदेशीर दायित्व जमा करण्याची जबाबदारी संस्थेची राहील .मागणीनुसार याबाबतची कागदपत्रे वेळोवेळी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडे जमा करणे संस्थेवर बंधनकारक राहील. याबाबत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडे कोणतेही दायित्व राहणार नाही.

७ मागणी केलेल्या कालावधीसाठी उमेदवार उपलब्ध होवू शकत नसेल अशावेळी संस्थेमार्फत पर्यायी व्यवस्था मान्य अटींसह करण्यात यावी .अन्यथा दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल .

८ प्रत्येक दिवसाच्या कामकाजाचा कालावधी सकाळी ९.३० ते सांयकाळी ६.०० असा राहील. (८.३० तास) राहील. यासाठी संबंधित उमेदवाराने त्याची कार्यालयात येण्याची व कार्यालय सोडण्याची वेळ याबाबत सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नोंदणीशाखेत ठेवण्यात येणा-या नोंदवहीत करणे आवश्यक राहील . या व्यतिरीक्त जादा कामासाठी शासन निर्णयात नमूद दराने भत्ते देय राहील .

९ मनुष्यबळाच्या सेवा पुरविण्याबाबत २००/- च्या स्टॅम्प पेपरवर शासनाशी एक वर्षाचा करार करणे आवश्यक राहील .

१० शासनाच्या आवश्यकतेनुसार विशिष्ट कालावधीसाठी उमेदवाराची मागणी केली जाईल.

११ शासकीय नियमानुसार सुट्टया अनुज्ञेय असतील. तसेच आवश्यकता असल्यास सुट्टीच्या दिवशीही कामावर यावे लागेल.

१२ कराराचे पालन समाधानकारकपणे न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणणे, तसेच कराराची मुदत शासनास आवश्यकता वाटल्यास वर्षभरापर्यंत (१ Year) आणखी वाढविणे याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०८२९१७१०४०९८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d0960900 3b414273f73, serialNumber=8ff188a569f4a95d2f0ce8ca61e60d8aa5f51a1bf65b42dd49 bb26d165941d9e, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.08.29 17:16:47 +05'30'

(डॉ. सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. वित्त विभाग (वि.सु.) / विनियम कार्यासन, मंत्रालय, मुंबई
६. प्रोप्रायटर,अल्फाकॉम सर्व्हिसेस इंडिया, B-१०५/B विंग ,कैलाश एस्पलांडे,घाटकोपर (वेस्ट) मुंबई-४०० ०८६,”
७. कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई (दोन प्रती)
८. कक्ष अधिकारी (आस्था-२), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई
९. निवडसंग्रह.